महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६३ वे | दिनांक : २३/०२/२०२६ | वार : सोमवार

## अजितदादांचे स्वप्न पूर्ण करणार : अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुतीचा निर्धार



**मुंबई :** महाराष्ट्रात सोमवारपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वी आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.

पत्रकार परिषदेत बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, उद्यापासून महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात विविध विषयांवर चर्चा व्हावी हे अपेक्षित असते. आता हे दुसरे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की अजितदादा यांनी राज्याचा ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. २०११ साली पहिल्यांदा सादर केलेला अर्थसंकल्प हा १ लाख ४४ हजार ७८३ कोटी रुपयांचा होता. तर २०२५ मध्ये त्यांच्या कारकीर्दीतील शेवटचे अर्थसंकल्प हे सर्वाधिक ७ लाख २० हजार कोटी रुपयांचे होते. ही केवळ आकड्यांमध्ये झालेली वाढ नाही तर राज्याच्या सर्वांगीण विकासात झालेली वाढ आहे.

पुढे बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, अजितदादांनी आर्थिक तडजोड कधीही केली नाही. विकास आणि शिस्त याचा समतोल राखत त्यांनी काम केले. फडणवीस साहेबांच्या मार्गदर्शनाच्याखाली आणि एकनाथ शिंदे यांच्या साथीने आदरणीय दादांनी अर्थसंकल्पाची जोरदार तयारी केली होती. यावर्षीचा हा त्यांचा १२ वा अर्थसंकल्प ठरला असता, पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते आणि आपल्याला ते सोडून गेले. लाडकी बहीण योजना बंद होईल अशी टीका विरोधकांनी केली. मात्र, अजितदादांनी योग्य आर्थिक नियोजन करून या योजनेसाठी निधीची कमतरता कधीही भासू दिली नाही. ही योजना यशस्वीपणे सुरू ठेवली. हे माझे पहिलेच अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे आणि अतिशय नियोजनपद्धतीने आणि चांगल्या प्रकारे पार पडेल अशी मला खात्री आहे, असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या.

यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, बजेट सेशन म्हटले की सगळ्यांचे लक्ष अजितदादांकडे लागून राहायचे. आता सुनेत्रा ताईंनी सांगितले की त्यांनी ११ बजेट सादर केले. पण आज अजितदादा आपल्यात नाहीत. दादांना श्रद्धांजली वाहून अधिवेशनाची सुरुवात करण्याची दुर्दैवी वेळ आमच्यावर आली आहे. शेवटी आपल्या हातात काही गोष्टी नसतात आणि नियतीसमोर आपले काही चालत नाही, हे या दुर्घटनेवरून सिद्ध झाले आहे. सुनेत्रा ताई आहेत आम्ही दोघेही त्यांच्या पाठीशी आहोत.

गेल्यावर्षी बजेट मांडताना अजितदादा म्हणाले होते, विकास आता लांबणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही. शिस्तप्रिय आणि आर्थिक घडी कशी बसवायची आणि प्रसंगी आपल्या सगळ्या सहकाऱ्यांना आपल्या राज्याच्या आर्थिक बाबींबद्दल स्पष्टपणे सांगणारे अजितदादा गेले २५-३० वर्ष सोबत काम करताना आपण पाहिले आहे. आता त्यांचे जे काही स्वप्न आहे ते आपण पूर्ण करणार आहोत, महाराष्ट्राला पुढे नेणार आहोत. आता यावेळेसचे बजेट मुख्यमंत्री देवेंद्रजी मांडणार आहेत. ते देखील उत्तम अर्थतज्ञ आहेत. राज्याची आर्थिक नाडी त्यांना माहित आहे.

## घाशीराम कोतवालशी तुलना; हर्षवर्धन सपकाळ यांचा देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा



**मुंबई :** महाराष्ट्राच्या आर्थिक अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी विरोधकांनी चहापानच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला आहे. तसेच पत्रकार परिषद घेत विरोधकांनी सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. देवेंद्र फडणवीस आणि काशीराम कोतवाल यांची कार्यपद्धती एकच आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, महाराष्ट्र विधीमंडळाच्या अधिवेशनाला उद्यापासून सुरु होत आहे. प्रत्येक अधिवेशनात गोंधळ घालण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न असतो. लोकशाहीला तिलांजली फासण्याचे काम सत्ताधारी करत असतात. अत्यंत टपोरीपनासारखे काम सुरु असते. हे सरकार लुटारु आहे. त्यामुळे सरकारने श्वेतपत्रिका काढावी. राम शास्त्री प्रभुणे यांचे पुणे देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपने तालिबान केला आहे. देवेंद्र फडणवीस आणि काशीराम कोतवाल यांची कार्यपद्धती एकच असल्याची टीका सपकाळ यांनी केली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, पुणे मुंबई जमीन घोटाळे त्याचा मलिदा किती लाटला हेही मागितले आहे. पुण्यातील ड्रग्स प्रकरण गुजरात कनेक्शन समोर येत आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच कॉंग्रेस ॲक्शन मोडमध्ये आहे. महापालिका निवडणुकीत आम्हाला हवे तसे यश मिळाले नाही, आम्ही पुणेकरांसाठी लढू, गप्प बसणार नाही, असा इशारा सपकाळ यांनी दिला आहे. तसेच वाहतूक पाणी स्वच्छता सर्व प्रश्नावर आम्ही आवाज उठवला. अमेरिकन बिल आले आहे, त्यामुळे सोयाबीनसह कापसाला फटका बसला आहे. अनेक ठिकाणी याचा फटका बसला आहे. पदयात्रा राज्यात काढणार आहात, हिंगोली यवतमाळ या ठिकाणी रॅली करणार असल्याचे सपकाळ म्हणाले.

आमचा पक्ष संविधान पद्धतीने पुढे जाणारा पक्ष आहे. हिंसा आम्ही मानत नाही, अंगावर आले तर शिंगावर करण्याची भाषा करु नये, लोकशाहीमध्ये आंदोलन करणे ठीक आहे पण चर्चा झाली पाहिजे, असे मत हर्षवर्धन सपकाळ यांनी मांडले आहे. तसेच राम शास्त्री प्रभुणे यांचे पुणे देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपने तालिबान केला आहे. देवेंद्र फडणवीस आणि काशीराम कोतवाल यांची कार्यपद्धती एकच आहे. पोलिसांनी सदरक्षणाय च काम करावे. आम्ही ड्रग्स प्रकरणात यापुढे कडक भूमिका घेऊ, असेही सपकाळ यांनी यावेळी स्पष्ट केले.

## राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून : विरोधकांचा सरकारच्या चहापानावर बहिष्कार



**मुंबई :** महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर महाविकास आघाडीने (MVA) शब्दांत बहिष्कार टाकला आहे. "सत्ताधारी पक्ष बहुमताच्या मस्तीत असून लोकशाही आणि संविधानाचा कोणताही सन्मान राखला जात नाही. अशा 'निर्लज्ज' आणि 'दुटप्पी' वागणाऱ्या सरकारच्या चहापानाला आम्ही जाणार नाही," असा घणाघात ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

भास्कर जाधव म्हणाले, आम्हा सर्वांना चहापानासाठी वैयक्तिकरित्या मुख्यमंत्री महोदयांचे पत्र आलेले आहे. परंतु, आम्ही त्या पत्रांवरून त्यांच्या चहापानाला जाणार नाहीत. सरकारच्या चहापानाला जाणार नाहीत, याचा अर्थ ही नेहमीचीच प्रथा पडलीये, असे आपल्याला वाटत असेल. तर तसे अजिबात नाही. मुळात सत्ताधारी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षाचे वर्तन हे सभ्यतेचे असावे लागते. लोकशाहीचा सन्मान करणारे आणि आपल्या देशाची राज्यघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचा सन्मान करणारे अशा पद्धतीचे वर्तन, अशाप्रकारची सभ्य वागणूक ही सत्ताधारी पक्षाची असावी लागते. परंतु, प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सत्ताधारी पक्ष मस्तीमध्ये आहे. एक प्रकारचा माज आल्यासारखे सत्ताधारी पक्षाचे वर्तन आहे. जिथे मान सन्मान नाही, सभ्यता नाही, लोकशाहीचा सन्मान नाही, घटनेबद्दल आदर नाही अशा ठिकाणी आम्ही चहापानाला जाणार नसल्याचे भास्कर जाधव म्हणाले.

भास्कर जाधव यांनी अधिवेशनापूर्वीच अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. ते म्हणाले की, "राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू हा अपघात होता की घातपात? अशी ठाम शंका संपूर्ण महाराष्ट्राच्या मनात आहे. सरकार यावर कुठेही स्पष्ट नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या एका जबाबदार नेत्याचा घात की अपघात? अशाप्रकारची जेव्हा चर्चा असते, त्यामुळे आम्ही चहापानाला जायचे नाही, असा निर्णय घेतलेला आहे."

सरकारच्या दुहेरी भूमिकेवर प्रहार करताना भास्कर जाधव यांनी शेतकरी आत्महत्या आणि वीजदराचा मुद्दा लावून धरला. " राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या आत्महत्या थांबायला तयार नाहीत. आम्ही वीजदर कमी करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते. त्याचबरोबर घरगुती डिजीटल मीटर जबरदस्तीने लावणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले होते. परंतु, चार दिवसांपूर्वी मुख्यमंत्री महोदयांचे स्टेटमेंट ऐकले की, संपूर्ण देशात अशापद्धतीचे अदाणीचे डिजीटल मीटर लावणारे महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे म्हणून छाती बडवतात. त्यामुळे अशापद्धतीच्या दुहेरी वागणाऱ्या लोकांच्या चहापानाला जायचे नसल्याचे आम्ही ठरवले," असे भास्कर जाधव म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ फेब्रुवारी २०२६


## बोरीच्या पोलीस ठाण्यावर नागरिकांचा मोर्चा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील बोरी येथे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी रात्री शिवप्रेमी नागरिकांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसवण्यात आला होता. यात पोलिसांनी हस्तक्षेप करून दिनांक २० फेब्रुवारी रोजी ४६ जणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. पोलिसांच्या या कार्यवाहीचा निषेध म्हणून बोरी व परिसरातील नागरिकांनी मिळून दिनांक २१ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात भव्य मोर्चा काढला आणि मागण्यांचे निवेदन दिले. या निवेदनात पोलीस बीट जमादार दिलावर खान पठाण यांना निलंबित करणे व चुकीचा एफ आय आर रद्द करणे या मागण्या करण्यात आल्या. या मागण्या मान्य न केल्यास मंगळवारी पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. या आंदोलनात बोरी व परिसरातील विविध गावांमधील हिंदू समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने जमले होते. जिंतूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांनी कडक पोलीस बंदोबस्त ठेवला होता.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## मदरगंगा शाळेत वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** हिवरखेडा येथील मदरगंगा शाळेत वार्षीक स्नेहसंमेलन शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडले कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेवक कचरू आव्हाळे यांच्या हस्ते पार पडले तर संस्थेचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीत व शेकडो पालकांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.आपल्या उद्घाटनपर भाषणात नगरसेवक श्री. कचरु आव्हाळे यांनी आज जरी मी उद्घाटक असलो तरी माझे व नातेवाईकांचे मुले याच शाळेत शिक्षण घेत असून मदर गंगा शाळेचे काम मी पालक म्हणुन १० वर्षापासून अनुभवत असून शाळेत शिक्षण घेतलेले माझे पाल्य इंजिनिअरिंग क्षेत्रात शिक्षण घेत आहे ही आनंदाची बाब आहे असे आपल्या भाषणात सांगीतले.संस्थेचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी गेल्या २२ वर्ष संस्थेचे कामकाज दर्जेदार असून विद्यार्थ्यांचा अभ्यासासोबतच सर्व कलागुणांना प्राधान्य दिल्या जाते यासाठी संस्था सांस्कृतीक कार्यक्रम शैक्षणिक सहल, क्रिडा विषयक विविध स्पर्धा, नवोदय प्रवेश परिक्षा, शिष्यवृत्ती परिक्षा, चित्रकला परीक्षा यासारखे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी संस्था मोठ्या प्रमाणात विविध उपक्रम राबवित असते. विद्यार्थाना संगणक ज्ञान मिळावे यासाठी स्वतंत्र संगणक कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून ०१ ते १० वी पर्यतच्या सर्व विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी वाचनालयाची स्थापना करण्यात आलेली असून विविध पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध केलेले आहे.हिवरखेडा (गौ) हे गाव पूर्वी डोंगरी विभागाच्या यादीत नव्हते यासाठी आपण विशेष प्रयत्न करून हिवरखेडा सोबतच तालूक्यातील ५२ गावांचा डोगरी विभागाच्या यादीत समावेश करून घेतला यामुळे डोंगरी शाळेतील शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थाना ३ टक्के मार्क बेनिफिट मिळतो याचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मिळणार आहे मदरगंगा इग्रजी शाळेची यावर्षीची ११ वी बॅच असून आजपर्यंत शाळेचा निकाल १०० टक्के लागलेला आहे.याचे श्रेय विद्यार्थ्यांसोबतच सर्व वर्गशिक्षकांना जाते त्यामुळे भविष्यात सर्वांच्या सहकार्याने मदरगंगा इंग्रजी शाळा पालकांचा विश्वास यापेक्षा जास्त प्रमाणात संपादित करण्यासाठी शाळा व मॅनेजमेंट कुठेही कमी पडणार नाही याची ग्वाही देतो असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य श्रीकांत झिंजुर्डे यांनी केले याप्रसंगी नगरसेवक कचरू आव्हळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे, सचिन शिंदे आशाबाई भोजने, संदीप शिंदे पालक लक्ष्मीकांत तायडे, दीपक कुमावत, नंदकुमार शेजवळ, शेखर मांडे, सतीश शर्मा, प्रवीण बर्डे,गणेश चेळेकर, रवींद्र जाधव तसेच शाळेचे व्यवस्थापक उदय सोनवणे शाळेचे शिक्षक दुर्गा काळे, रूपाली शेजवळ, योगिता जाधव, शुभांगी पठाडे, प्रियंका छत्रे, वर्षा निकम जयश्री वाडीले, छाया हिंगे, गीता झिंजुर्डे, शीतल पाटील, भोसले, पूजा वाळुंजे इशिता शर्मा, अश्विनी जाधव, धीरज राठोड, अनिकेत गोंडे, सागर शेळके उपस्थित होते.

## आई-वडील हेच पहिले गुरु; त्यांचा सन्मान म्हणजेच खरी शिवजयंती - वसंत हंकारे



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मोबाईल आणि आधुनिक जीवनशैलीच्या प्रभावामुळे मुलांमध्ये वाढत चाललेली दुरावस्था टाळण्यासाठी पालकांनी मुलांना वेळ देणे, संवाद साधणे आणि आदर्श वर्तन ठेवणे आवश्यक आहे. आई-वडील हेच पहिले गुरु आहेत. त्यांच्या कष्टांचे मोल जाणून त्यांचा सन्मान राखणे, हीच खरी शिवजयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे यांनी केले. शिवजयंतीच्या उत्सवी वातावरणात शहरवासीयांसाठी अशोक चौकातील मुख्य रस्त्यावर किसान शिवजन्मोत्सव समिती किसान चौक यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात वसंत हंकारे यांनी " आई-वडील आणि संस्कारांचे पावित्र्य " या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. शनिवारी (ता. 22) रोजी रात्री आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती राहिली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगरसेवक राजेंद्र बेंडकाळे, गौस शेख, सुजित शेळके, राजू मुल्ला, राहुल वाघ, रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कलाप्पा पाटील, संतोष कांबळे, सुनील राठोड, डॉ. खाजालाल ढोबळे, नागनाथ बदोले, विजयकुमार देशमाने, संजय सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.वसंत हंकारे यांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वातून शिवरायांच्या जीवनातील मातृसंस्कारांचे महत्त्व उदाहरणासह अधोरेखित केले. राजमाता जिजाऊंनी दिलेल्या संस्कारांमुळेच शिवराय घडले. आई-वडिलांचे आशीर्वाद आणि योग्य संस्कार हीच प्रत्येक व्यक्तीच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आई-वडिलांना जीवनात कधीही विसरता कामा नये. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबव्यवस्थेचे जतन करण्याची गरज व्यक्त केली. त्यांच्या भाषणादरम्यान उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी शिवरायांच्या विचारांचा अंगीकार करून कुटुंबातील नात्यांचे पावित्र्य जपण्याचा संकल्प करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था करण्यात आली होती. किसान शिवजन्मोत्सव समिती किसान चौक अध्यक्ष रामहरी अंबर, उपाध्यक्ष स्वप्निल जाधव, सचिव विशाल जाधव, सहसचिव पवन फुकटे आदींनी पुढाकार घेऊन यशस्वी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन मोहन जाधव तर आभार अजिंक्य मुरूमकर यांनी मानले. हा कार्यक्रम नागरिकांनी शांततेत व उत्साहात पार पाडत प्रेरणादायी व संस्कारमूल्यांची जाणीव करून देणारा ठरल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ फेब्रुवारी २०२६


## श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील एनएसएस विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरास सुरुवात



**उमरगा (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** ग्रामीण भागातील पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमिनीच्या विकासासाठी युवकांची भूमिका अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने मौजे व्हंताळ येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात शुभारंभ शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी झाला. "पाणलोट व्यवस्थापन व पडीत जमिनीच्या शाश्वत विकासासाठी युवक" हे ब्रीद घेऊन हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. विनोदकुमार वायचळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. यावेळी लातूर येथील सहायक पोलीस निरीक्षक श्री. महावीर जाधव, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, सरपंच श्री माधव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. विनोद कुमार वायचळ यांनी जलसंवर्धन, मृदसंवर्धन व पर्यावरण रक्षण या बाबी आजच्या काळात अत्यंत आवश्यक असून युवकांनी प्रत्यक्ष कृतीतून या क्षेत्रात योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले. पाणलोट व्यवस्थापनामुळे शेती, पाणी व ग्रामीण जीवनमानात सकारात्मक बदल घडून येतो, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव यांनी युवकांनी समाजहिताची जाणीव ठेवून शिस्तबद्ध व सकारात्मक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, नेतृत्वगुण व सेवाभाव निर्माण करणारी चळवळ असल्याचे सांगितले.या शिबिराच्या कालावधीत घेण्यात येणारे उपक्रमाबद्दलची माहिती कार्यक्रमाधिकारी डॉ. भरत शेळके यांनी प्रास्ताविकात दिली. स्वयंसेवकांकडून श्रमदान, स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, जलसंधारणाविषयी जनजागृती असे विविध उपक्रम राबविण्यात येणार त्यांनी सांगितले.याप्रसंगी व्हंताळ येथील उपसरपंच विजय सगर, रविंद्र जगताप, विठ्ठल जाधव, महेश पाटील, राजाभाऊ पाटील, नंदकुमार जाधव,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. भरत शेळके, डॉ. अनिल देशमुख, प्रा. मुरलीधर जाधव, , डॉ. अतुल बिराजदार, प्रा. मनोज गायकवाड, प्रा. महेश जोशी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजपत्रात अधिसूचना; निवडणूक पूर्ण होईपर्यंत विद्यमान सरपंच-सदस्यच प्रशासक




**बुलढाणा (महेश मुंढे) :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत महत्त्वाचा निर्णय घेत मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे, शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या असाधारण राजपत्रात या संदर्भातील आदेश जाहीर करण्यात आला आहे. अधिसूचनेनुसार संबंधित ग्रामपंचायतींचा नियमित कार्यकाळ संपल्यानंतर निवडणूक प्रक्रिया अजूनही पूर्ण न झाल्यामुळे प्रशासकीय अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे, यामध्ये विद्यमान सरपंच, उपसरपंच, सदस्य यांचीच प्रशासक म्हणून सहा महिन्यांकरिता किंवा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नेमणूक करावी असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे, या कालावधीत प्रशासक म्हणून काम पाहणारे विद्यमान पदाधिकारी ग्रामपंचायतीचे सर्व नियमित प्रशासकीय व आर्थिक अधिकार वापरतील. पाणीपुरवठा, स्वच्छता, ग्रामविकास कामे, कर वसुली, शासकीय योजनांची अंमलबजावणी आदी कामे अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच राहणार आहे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन नव्याने लोकनियुक्त सदस्य कारभार स्वीकारेपर्यंत ही तात्पुरती व्यवस्था लागू राहणार असल्याचेही या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार संबंधित अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शक सूचना देण्यात येणार असून ग्रामविकास विभागाच्या नियंत्रणाखाली कामकाज पार पडेल किनगाव राजासह संबंधित ग्रामपंचायत मध्ये या निर्णयामुळे प्रशासनात सातत्य राखले जाणार असून विकास कामे ठप्प न होता नियमित सुरू राहतील अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये जिंतूर पंचायत समिती अव्वल




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** परभणी जिल्हा परिषद व्यवस्थापन अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे शारीरिक, मानसिक, भावनिक आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून जिल्हा परिषद परभणी च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर यांच्या संकल्पनेतून आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्सीकर यांच्या नियोजन मधून क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धा बीटस्तर, तालुकास्तर व जिल्हा स्तरावर संपन्न झाल्या. जिंतूर पंचायत समिती चे गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी अतिशय नियोजनबद्ध बीटस्तर व तालुकास्तर स्पर्धा घेऊन क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये नैपुण्य प्राप्त असणाऱ्या स्पर्धकांची व कलाकारांची निवड केली. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यांचा सराव करण्यासाठी व्यवस्थित नियोजन करून सर्व स्पर्धक व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलाकारांना पुरेसा वेळ उपलब्ध करून दिला. प्रत्यक्ष होणाऱ्या सरावाचे निरीक्षण केले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या सरावामध्ये क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात नैपुण्य व कौशल्य दाखविणाऱ्यावर बारकाईने लक्ष ठेवून अंतिम जिल्हा स्तरावर क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेसाठी जिंतूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची योग्य निवड केली. या कार्यामध्ये गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी शिक्षण विभागा अंतर्गत कार्यरत स्पर्धक व कलाकार यांच्या समन्वयासाठी विशेष प्रयत्न केले. दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२६ रोजी परभणी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये जिंतूर पंचायत समितीने सर्वच क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात आपला उल्लेखनीय सहभाग नोंदवला. एवढेच नव्हे तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात व सामुहिक क्रीडा प्रकारात जिंतूर तालुक्याने भरीव यश संपादन केले. यामध्ये रस्सीखेच, बॅडमिंटन, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, धावणे, गोळा फेक, चालणे या विविध क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. तर सांस्कृतिक स्पर्धेतही जिंतूरने आपली उल्लेखनीय कामगिरी नोंदवत गीत गायन वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, हास्यजत्रा यामध्ये वेगवेगळे क्रमांक मिळवले स्वतः गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी उत्कृष्ट गीत गायन करत प्रथम क्रमांक मिळवला. एकंदरीत जिंतूर तालुक्याच्या या क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्सीकर यांनी जिंतूर तालुक्याचे विशेष कौतुक केले. जिल्हाभरामध्ये गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांच्याकडे असणारी कल्पकता गुणग्राहकता आणि शिस्तबद्ध नियोजनाचे कौतुक होत आहे. सर्व स्पर्धेत शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग यासाठी तीन वर्षापासून सुरू असणाऱ्या शिक्षकांच्या विविध स्पर्धेबद्दल गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांच्याही कार्याचा गौरव केला जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ फेब्रुवारी २०२६


# संत गाडगे बाबा : समाजजागरणाचा दीपस्तंभ

**भा**रतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी जन्माला आली आहेत की ज्यांनी कोणतीही सत्ता, राजकीय पद, संपत्ती किंवा संघटनात्मक बळ न वापरता समाजमनावर खोलवर आणि दीर्घकालीन प्रभाव टाकला आहे. ही व्यक्तिमत्त्वे लोकांच्या जीवनाशी एकरूप झाली, त्यांच्या दु:खांशी संवाद साधला आणि कृतीतून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. अशाच थोर समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी, पण अत्यंत साधा दीप म्हणजे संत गाडगे बाबा होय. 23 फेब्रुवारी हा दिवस त्यांच्या जयंतीचा असला तरी तो केवळ एका संताचा जन्मदिन नाही, तर सामाजिक स्वच्छता, मानवतावाद, विवेकनिष्ठ अध्यात्म, श्रमप्रतिष्ठा आणि समतेच्या मूल्यांचा सार्वजनिक उत्सव आहे. संत गाडगे बाबांचे जीवन हे वैयक्तिक मोक्षसाधनेपेक्षा सामाजिक उद्धारासाठी समर्पित होते.संत गाडगे बाबांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डेबूजींना बालपणापासूनच दारिद्र्य, कष्ट, उपासमार आणि सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण फारसे मिळाले नाही, परंतु जीवनाच्या शाळेतून त्यांनी जे शिक्षण घेतले ते अत्यंत व्यापक, खोल आणि समाजपरिवर्तनाची दिशा देणारे होते. लहान वयातच त्यांनी ग्रामीण समाजातील अस्वच्छता, अंधश्रद्धा, दारूचे व्यसन, जातिभेद, कर्मकांड आणि स्त्रियांची दुर्दशा यांचे विदारक चित्र पाहिले. या वास्तवाने त्यांचे मन अस्वस्थ झाले आणि हीच अस्वस्थता पुढे समाजप्रबोधनाची प्रेरणा ठरली.गाडगे बाबांचे आयुष्य पारंपरिक अर्थाने संन्यस्त नव्हते. त्यांनी कोणताही मठ स्थापन केला नाही, आश्रम उभारला नाही किंवा औपचारिक शिष्यपरंपरा चालवली नाही. त्यांच्या हातात ग्रंथाऐवजी झाडू होती, अंगावर फाटकी वस्त्रे होती आणि चेहऱ्यावर समाजासाठी झिजणाऱ्या माणसाचे तेज होते. त्यांनी लोकांना सांगितले की देव दगडात नाही, तो माणसात आहे; पूजा कर्मकांडात नाही, ती सेवेत आहे; आणि अध्यात्म पलायनात नाही, तर समाजाशी बांधिलकी ठेवण्यात आहे. त्यांनी स्वत: हातात झाडू घेऊन गावोगावी सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली आणि स्वच्छतेला नैतिक व आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले.स्वच्छता हा संत गाडगे बाबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता, पण ती केवळ भौतिक स्वच्छतेपुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता म्हणजे विचारांची, वर्तनाची आणि सामाजिक रचनेची स्वच्छता होती. अस्वच्छ परिसर म्हणजे रोगांना आमंत्रण, रोग म्हणजे दारिद्र्य आणि दारिद्र्य म्हणजे अज्ञान, अशी साखळी त्यांनी लोकांना समजावून सांगितली. स्वच्छता म्हणजे आरोग्य, आणि आरोग्य म्हणजेच समाजाचा खरा धर्म, ही त्यांची ठाम भूमिका होती. आज स्वच्छतेवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होते, परंतु शंभर वर्षांपूर्वी गाडगे बाबांनी ही चळवळ प्रत्यक्ष कृतीतून सुरू केली होती.गाडगे बाबांचे समाजप्रबोधन हे भाषणांपुरते मर्यादित नव्हते. ते स्वत: नाल्या साफ करत, कचरा उचलत, धर्मशाळा, बाजारपेठा आणि यात्रास्थळे स्वच्छ करत आणि त्याच वेळी लोकांशी संवाद साधत. त्यांच्या कीर्तनांमध्ये चमत्कार, अवतारकथा किंवा भीतीवर आधारित धर्म नव्हता. त्यांच्या कीर्तनांचा केंद्रबिंदू होता शिक्षण, विवेक, व्यसनमुक्ती, जातिभेदाचा निषेध आणि स्त्रीपुरुष समानता. साध्या, लोकभाषेतील उदाहरणांनी ते गंभीर सामाजिक प्रश्न मांडत आणि त्यामुळे सामान्य माणसाला ते आपले वाटत.दारूचे व्यसन हे ग्रामीण समाजाच्या अध:पतनाचे एक मोठे कारण आहे, हे गाडगे बाबांनी अचूक ओळखले होते. दारूमुळे कुटुंब उद्ध्वस्त होते, महिलांवर अत्याचार वाढतात, मुलांचे शिक्षण बिघडते आणि आर्थिक परिस्थिती ढासळते. म्हणूनच त्यांनी दारूबंदीचा आग्रह धरला. त्यांनी व्यसन करणाऱ्यांवर टीका केली, पण द्वेष केला नाही. परिवर्तन हे दंडाने नव्हे, तर प्रबोधनाने होते, हा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या प्रभावामुळे अनेक गावांमध्ये दारूची दुकाने बंद झाली आणि व्यसनमुक्तीचे वातावरण निर्माण झाले.शिक्षणाबाबत गाडगे बाबांची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि दूरदृष्टीची होती. “विद्या विणा मती गेली, मती विणा नीती गेली, नीती विणा गती गेली, गती विणा वित्त गेले,” या ओळींमधून त्यांनी शिक्षणाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी किंवा पद मिळवण्याचे साधन नसून विवेक, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे, असे ते मानत. त्यांनी गरीब, अनाथ आणि वंचित मुलांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला आणि अनेक शाळा, वसतिगृहे व शैक्षणिक उपक्रमांना मदत केली.जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींवर गाडगे बाबांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली. त्यांनी सर्व माणसे समान आहेत, ही भूमिका केवळ शब्दांत न ठेवता कृतीतून दाखवली. त्यांनी दलित वस्त्यांमध्ये जाऊन स्वच्छता केली, त्यांच्या सोबत भोजन केले आणि त्यांना माणूस म्हणून सन्मान दिला. देव जर सर्वांचा निर्माता असेल, तर माणसामाणसात भेद कसा, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला. त्यांच्या विचारांमध्ये संत तुकाराम, संत कबीर आणि महात्मा फुले यांच्या परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.स्त्रियांच्या प्रश्नांबाबतही गाडगे बाबांची भूमिका प्रागतिक होती. त्यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले, बालविवाहाचा निषेध केला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. समाजाचा खरा विकास तेव्हाच होतो, जेव्हा स्त्रियांना सन्मान, शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळते, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्त्रीपुरुष समानतेचा संदेश दिला आणि कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे महत्त्व अधोरेखित केले.गाडगे बाबांचे अध्यात्म कर्मकांडविरहित आणि विवेकनिष्ठ होते. उपास, व्रत, तीर्थयात्रा यांपेक्षा उपाशी माणसाला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि अज्ञान दूर करणे हेच खरे पुण्यकर्म आहे, असे ते मानत. त्यांनी अंधश्रद्धेचा तीव्र निषेध केला आणि श्रद्धेला विवेकाची जोड दिली. त्यांचे अध्यात्म माणसाला माणूस बनवणारे होते.गाडगे बाबांचे जीवन म्हणजे सतत चालत राहण्याचे, भटकंतीचे जीवन होते. त्यांच्या पायात चप्पल नव्हती, डोक्यावर छत्री नव्हती, आणि खांद्यावर एक झोळी होती. या झोळीतून त्यांनी लोकांकडून मिळालेला पैसा स्वत:साठी कधीही वापरला नाही. तो पैसा समाजकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंना मदतीसाठी खर्च केला. त्यांनी संपत्ती साठवली नाही, कारण त्यांच्या मते समाजसेवेतच खरे वैभव आहे.आजच्या काळात, जेव्हा धर्माचे राजकारण केले जाते, अध्यात्माचे व्यापारीकरण झाले आहे आणि समाजमाध्यमांवर दिखाऊ सेवाभाव दिसतो, तेव्हा संत गाडगे बाबांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी संस्था उभारली नाही, पण विचारांची चळवळ निर्माण केली. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत, पण त्यांचे संपूर्ण जीवनच एक चालते-बोलते ग्रंथ होते.23 फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबांची जयंती साजरी करताना केवळ प्रतिमापूजन, भाषणे किंवा मिरवणुका पुरेशा नाहीत. त्यांच्या विचारांचे आचरण हेच खरे अभिवादन आहे. परिसराची स्वच्छता राखणे, अंधश्रद्धेला विरोध करणे, व्यसनांपासून दूर राहणे, शिक्षणाला प्राधान्य देणे, जातिभेद नाकारणे आणि मानवतेला धर्म मानणे हीच गाडगे बाबांची शिकवण आहे.संत गाडगे बाबा हे केवळ एका जातीचे, एका प्रदेशाचे किंवा एका काळाचे नव्हते. ते संपूर्ण मानवजातीचे होते. त्यांनी समाजाला आरसा दाखवला, प्रश्न विचारायला शिकवले आणि बदलाची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही आजच्या काळाची गरज आहे. कारण जिथे स्वच्छता, समता, विवेक आणि करुणा आहे, तिथेच खरा धर्म आहे आणि हाच संत गाडगे बाबांचा अमर संदेश आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra५@gmail.com



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103



## ग्रंथपाल महादेव आगजाळ व नेमिनाथ जैन होणार पुरस्काराने सन्मानित



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** सेलू येथील स्वामी रामानंद तीर्थ हिंदी मराठी ग्रंथालयाचे ग्रंथपाल महादेव माणिकराव आगजाळ यांना सन २०२४-२५; तसेच बोरी (ता. जिंतूर) येथील जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जयकुमारजी जैन यांना सन २०२५-२६ या वर्षीचा परभणी जिल्हास्तरीय उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.गुळखंड (ता. पालम) येथील जय भवानी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांच्या वाचन संस्कृतीतील योगदानासाठी प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण बुधवार, 25 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 9.00 वाजता एका विशेष कार्यक्रमात केले जाणार आहे, असे ग्रंथालयाचे अध्यक्ष बापूसाहेब पौळ आणि सचिव पुष्पावती पौळ यांनी १६ फेब्रुवारी रोजी पत्राद्वारे कळविले आहे.महादेव आगजाळ यांनी सेलू येथील ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचन चळवळ जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. उत्तम संघटक आणि रोखठोक व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेल्या आगजाळ यांनी केवळपुस्तके जतन न करता ती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठे कष्ट घेतले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.बोरी येथील जयकुमार जी जैन सार्वजनिक वाचनालयाचे उपक्रमशील ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी ग्रंथालय क्षेत्राच्या माध्यमातून वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि ती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. दरवर्षी विविध उपक्रम श्री जैन हे राबवीत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यातील ग्रंथालय क्षेत्रात तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध संस्था आणि वाचक प्रेमींनी या दोन्ही ग्रंथपालांच्या निवडीचे स्वागत केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ फेब्रुवारी २०२६

# पारधी समाज जीवनाची व्यथा मांडणारे आत्मकथन - विंचवाचं तेल




**सा**हित्य आणि समाज यातील अनुबंध हा परस्पराश्रयी आहे. साहित्यातून लेखकाचे आत्मनिष्ठ जीवनदर्शन जसे घडते; तसेच त्याचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाशय प्रकट होते .लेखक ज्या सामाजिक अवकाशात आपले जीवन जगतो तेव्हा त्या-त्या समाजातील जीवनपद्धती ,धारणा त्याला जन्मापासून घडवत असतात. याच अवकाशात लेखकाचे अनुभव विश्व समृद्ध होते. त्याचा आविष्कार साहित्यातून होतो . मूलतः लेखक आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाशात विविध घटकांचा अन्वयार्थ लावून स्वतःच्या भाषेत कलात्मक पद्धतीने अभिव्यक्त करतो. भाषा ही तर सामाजिक संपत्ती आहे. याच भाषेच्या माध्यमातून त्या त्या समाजातील संस्कृतीचे वहन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते.म्हणून साहित्य ही सामाजिक व सांस्कृतिक घटना असते. एखाद्या लेखकाचे भाषिक लेखन प्रकाशित होते म्हणजे केवळ ते त्याचे आत्मगत नसते तरत्याच्या आत्मनिष्ठ जाणीवेच्या मुळाशी त्याचे सामाजिक आणि सांस्कृतिक संचित घट्टपणे चिकटलेले असते . मराठी साहित्यसंस्कृतीचा विचार करता एक बाब स्पष्टपणे सिद्ध होते; ती म्हणजे मध्यवर्ती अभिजन साहित्यधारा आपापल्या मूठभर सांस्कृतिक धारणांचे आणि अनुभवांचे उदात्तीकरण करण्याचे प्रयत्न करीत असते. म्हणून ती आशयापेक्षा कारागिरीला साहित्यात महत्व देत आली आहे. या अनुषंगाने निर्माण झालेले साहित्य सिद्धांत आणि दृष्टिकोन यांच्या पलीकडे न जाता वंचित, शोषित, न- वर्ण, पीडित साहित्य प्रवाहांपासून स्वतःला अलिप्त ठेवण्याचे काम निष्ठेने करत आलेली आहे. मराठी साहित्यात भटके-विमुक्तांतील स्त्री लेखिका आपल्याला बोटावर मोजण्या इतक्या सुद्धा दाखविता येत नाहीत. त्याचे कारण म्हणजे तिचा विचार माणूस म्हणून कुठल्याही व्यवस्थेने केलेला आढळत नाही. अशा पार्श्वभूमीवर विमल मोरे, जनाबाई गिर्हे आणि सुनीता भोसले यांची स्वकथने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.मूलतः स्वकथनांमधून लेखकाचा संघर्षमय जीवन प्रवास चित्रित होतो.त्याच्या व त्याच्या समाजाच्या वाट्याला आलेली वेदना, त्याचा व त्याच्या समूहाचा अनंत काळचा आक्रोश,भूक,अवहेलना,त्याचे शोषण,त्याच्या व समाजाच्या वाट्याला आलेले पशुवत जीवन,उपेक्षा जशी व्यक्त होते. तसाच त्याचा याविरुद्ध चा संघर्ष प्रकट होतो.' विंचवाचे तेल'(2019) हे सुनिता भोसले यांचे स्वकथन केवळ फासेपारधी जमातीचे कथन नाही तर भटक्या विमुक्त स्त्रीचे कमी-अधिक प्रमाणात वास्तव आहे. पारधी जमातीतील पुरुष लेखकांनी यापूर्वी आपले स्वकथने लिहिली आहेत. त्यात पोलीस आणि समाज व्यवस्थेकडून चोर म्हणून जो भीषण अत्याचार त्यांच्या वाट्याला आला आहे. तो धीटपणे अनुभव या लेखकांनी मांडले आहेत. लेखिका सुनीता भोसले या आत्मकथनातून पोलीस आणि समाजव्यवस्थेचा अन्याय-अत्याचार चव्हाट्यावर उजागर करतेच पण पारधी जमातीतील रूढी परंपरा ह्या स्त्रियांना किती पशुवत जीवनानुभव देतात. याचा टचटचीत प्रत्यय आपल्या स्वकथनांमधून वाचकांना देतात. मध्यवर्ती समाजव्यवस्थेला ज्ञात नसलेले स्त्रीजीवन किती भीषण आणि भयंकर असू शकते याचे हे एक उदाहरण आहे. विंचवाचं तेल पारधी समाजातली मी माझीही जिवलंत जिंदगानी अशा शीर्षकानेच सुनिता भोसले यांनी आपले धगधगते जीवन आणि पारधी समाजाचे वास्तविक चित्र अधोरेखित केले आहे या अनुभव कथनात सुनीता भोसले यांच्या जीवनातील संघर्ष आणि कौटुंबिक जीवन संघर्ष प्रकर्षाने चित्रीत होतोसुनिता भोसले यांचे अनुभव वाचताना सतत जाणवते की त्यांच्या वाचनातून अनेक नवे कार्यकर्ते सक्रिय होतील त्यांच्या अनुभवांची ढग आणि त्यातलं कारण्य हे दोन्ही वाचणाऱ्याला कार्यशील बनू शकतील असे हे अनुभव कथन आहेविंचवाचे तेल या अनुभव कथनाचे लेखन 14 प्रकरणात झालेले आहे यात संघर्षाची सुरुवात, गणगोत ,शाळा सुटली, माझ्या आईची चित्तरकथा , माझ्या लग्नाचा घाट, जातपंचायतीच्या वर्चस्वाखाली पारधी समाजाला लागलेला शाप विटाळ , न संपणाऱ्या कोर्टकचेऱ्या, माझ्या बा'ची गोष्ट , चुलत्याचा ताप , आयुष्याला कलाटणी देणार मानवी हक्क अभियान, पारधी समाज संघटनेचे नगरचे पहिले अधिवेशन ,काही गाजलेली प्रकरण हितचिंतक आणि कार्यकर्त्यांची मनोगत अशा घटकांन्वये आपले अनुभव कथन सुनीता भोसले यांनी मांडले आहे यास सह लेखक म्हणून प्रशांत रूपवते यांनी लेखन केले आहेसुनिता भोसले यांनी एखादा प्रसंग घटना सांगत असे अशा घटना बहुतेक हादरवून टाकणाऱ्या असायच्या आठ वर्षाची असतानाच अनुभव कथन करतात की उकिरड्यावर टाकलेल्या उष्ट्या पत्रावळीतून बुंदी गोळा करत असे या बुंदीचा चोरीचा आळ येऊ नये म्हणून बुंदीची पिशवी लांब झाडाखाली ठेवतात तर कुत्री संध्याकाळी ती पिशवी पळवून नेतातसुनिता भोसले यांच्या वाटेला आलेल्या जिंदगानीचा संघर्ष हा जन्मापासूनचा आहे. वडिलांकडची माणसांचा व्यवहार हा अत्यंत त्रासदायक होता तर आई ही तिच्या दिराबरोबर लग्न केला नाही त्याचा राग होता कुटुंबातील अनेक नात्यातील संघर्ष लहानपणापासूनच सहन करावा लागला. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत गावात दोन वेळेस भीक मागून आणायला जावं लागत असे एका रुपयासाठीही बहिण भाऊ यांनी सांगितलेली काम करत असे भीक मागून जेवण जगतानाच्या आठवणी सांगताना सुनिता भोसले हे खूप रडत असे त्यांच्या जीवनात आलेला हा संघर्ष हा इथल्या समाजाच्या घाणेरड्या संस्कृतीमुळेच निष्ठूर आणि निर्गुण जीवन होते नंतर ज्या काळात फुले आंबेडकरी चळवळीची जाणीव झाली यामुळे सन्मानाने जे जगण्याचे बळ मिळाले आहे असे सुनीता भोसले कथन करतात. सुरुवातीच्या काळातील संघर्ष आणि नंतरच्या काळात आलेले आत्म जाणीव किंवा स्व जाणीव ही या ' संघर्षाची सुरुवात' चा असे म्हणता येईलपारधी समाजातील कुटुंब पद्धती ही एकत्र कुटुंब पद्धती नसून लग्नानंतर प्रत्येकाला वेगळा संसार थाटावा लागतो. यात बाईची परिस्थिती देखील इतकी वाईट की ती लग्नानंतर फक्त नव्यालाच तिच्या हातचे खायला मिळत असे आणि ती स्वतः जेवण नवऱ्याबरोबर त्याच्या थाटात करायची कारण बायकोने नवऱ्याला वर विष प्रयोग करू नये म्हणून ही काळजी घेतली जात असे. अतिशय रानटी आणि अघोरी प्रथा पारधी कुटुंबात पाहायला मिळतेपारधी समाजात नैसर्गिक मरणाचे प्रमाण फार कमी आहे बहुतेक पुरुषांचा मृत्यू पोलीस कोठडी पोलिसांच्या मारहाणीत किंवा चोरीच्या आरोपावरून किंवा संशयावरून त्याचा खून करतात अशी अवस्था पारधी समाजातील पुरुषांची आहेपारधी समाजाची रीत ही याविषयी ते नोंदवतात की पारधी समाजात दारू प्यायची आणि रात्रभर बोंबलायचं बायकोला मारायचं अशी ते नोंद अनुभव कथनात करतात पारधी समाजाकडे पाण्याचा इतर समाजाचा दृष्टिकोन या अनुभव कथनामध्ये सतत जाणवतो. सुनिता भोसले यांनी शाळेविषयीचे अनुभव कथन केले आहे दोघे बहिण भाऊ आणि आई यांच्यातील नातेसंबंधासाठी सुनीता भोसले यांना शाळा सोडावी लागली आहे. सुनीता भोसले यांच्या वरती प्राथमिक शाळेतील दौंडकर गुरुजी, बाबुराव बेंद्रे गुरुजी यांनी केलेल्या संस्कारामुळे भाषण करण्याचे धाडस निर्माण झाले याचा उपयोग पुढील जीवनात सुनीता भोसले यांनी करू लागले भाऊ अविनाश शाळा शिकायचा याच काळात घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतावर रोजनदारी करणे मजुरी करणे ही काम करावी लागत असे. स्मिता भोसले व त्यांची आई ने शेवटी निर्णय घेतला की शेळ्या विकायच्या त्यातून लोकांची देणेही द्यायची आणि रोजंदारीवर काम करायची या परिस्थितीतच शाळा ही कायमची सुटली. सुनीता भोसले यांनी आईच्या जीवनाची चित्तरकथा ही रेखाटली आहे. वयाच्या तिसाव्या वर्षी विधवा झाली ती त्या वयातली पारधी समाजातील एकमेव असे तिसाव्या वर्षी विधवा होऊनही तिने दुसरा विवाह केला नाही नाहीतर पारधी समाजात बाईचा नवरा मयत झाला की तिने दिराबरोबर बिराड करायचं असतं नाहीतर पुनर्विवाह तरी करायचे असते अशा अतिशय अनिष्ट रूढी प्रथा परंपरा या पारधी समाजात आणि संस्कृतीत पाहायला मिळत असे. दलितांसोबतही भेदभाव हा पारधी समाजात पाहायला मिळतो कारण हा पारधी समाज त्यांना अस्पृश्य मानतो तर आपणही त्यांना अस्पृश्य मानलं पाहिजे असे आईचे म्हणणे असेजातपंचायतीच्या वर्चस्वाखाली असणारा पारधी समाज प्रकर्षाने जाणवतो याचे कारण या समाजातील लोकांचे अज्ञान पंचांचा निर्णय हा अंतिम मान्य असा या जातपंचायतीमुळे या पारधी समाजाची किती अतोनात नुकसान झालेले आहे हे या कथनामध्ये सतत दिसून येते. जात पंचायतीमध्ये लग्न सोडचिट्ठी बायकांना नांदत नाही द्याज ही प्रकरणे पण समाजातले नियम तोडलेले केसेस रूढी परंपरा तोडल्याची प्रकरणे यात घर पाठवणं मुलं पाठवणं मयत माणसांचा हाड काढून नेणं बाई माणसांची लघवी टाकणं मासिक पाळीचे कापड टाकणे , महिलेला पुरुषाला लाथ मारायला सांगणे इत्यादी प्रकारामुळे जात पंचायती गंभीर होतात जात पंचायतीमध्ये महिलांनाही निर्वस्त होण्यास भाग पाडला जातोय असेही जात पंचायतीचे वर्चस्व पारधी समाजात असल्याचे सुनीता भोसले यांनी सांगितले आहेपारधी समाजाला लागलेला शाप-विटाळ ही प्रथा अत्यंत वाईट आहे. घरात जितक्या महिला असतील तितक्या घराबाहेर दगडाच्या नाणी असतात तेवढ्याच बादल्याही एकमेकीच्या बादल्यांना मगाला स्पर्श देखील करायचा नाही हे सगळं बाईचं लग्न झाल्यावर म्हणजे नवऱ्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यावर लागू होतं असा संकेत या समाजात दिला जातो. पारधी समाजातील महिला ही पूर्णपणे विटाळलेलीच आहे कारण एका स्त्रीचे दुसऱ्या स्त्रीशी कुठलाही संबंध ठेवता येत नाही कारण विटाळ होतो ही अनिष्ट प्रथा पाहायला मिळते एवढेच नाही तर डिलिव्हरीच्या वेळी देखील त्या महिलेला कोणी मदत देखील करणार नाही तिच्या पोटावर उभे राहून पाय दिला जातो आणि लेकरू बाहेर येते अशी ही अमानुष संस्कृती येथे दिसून येते. बाळ मरो नाही तर माय मरो पण संस्कृती तुटली नाही पाहिजे अशी विकृत संस्कृती येथे जाणवते.

**डॉ. नारायण शिवशेट्टे**
मराठी विभाग पानसरे महाविद्यालय,
अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड
भ्रमणध्वनि : 9422558573

**विंचवाचे तेल (आत्मकथन) - सुनीता भोसले,**
रोहन प्रकाशन, पुणे,
प्रथमावृत्ती जानेवारी 2019

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ फेब्रुवारी २०२६


## आमच्या हक्काचं आमच्यापासून हिसकावून घेऊ नका...

पिढ्यान्पिढ्यांचा मच्छीमारी
पोटापाण्याचा धंदा आमचा
असा हिसकावून नेऊ नका
आमच्याच हक्कासाठी
आम्हाला लढायला लावू नका...

आमच्या हक्काचं आमच्यापासून
हिसकावून घेऊ नका
आमच्या लेकराबाळांच्या तोंडातला घास
असा ओढून घेऊ नका...

उपाशी मरतील आमच्या पिढ्या
मुडदे शासनदरबारी आणायला लावू नका
मच्छीमार हीच आमची खरी ओळख
आमच्यापासून हिरावून नेऊ नका...

आमच्या हक्काचं आमच्यापासून
हिसकावून घेऊ नका
आमच्या लेकराबाळांच्या तोंडातला घास
असा ओढून घेऊ नका...

भरू द्या पोट आम्हाला
जलक्रांती करायला लावू नका
निरपराध समाज आमचा
अपराध्यांच्या पिंजऱ्यात अडकवू नका...

आमच्या हक्काचं आमच्यापासून
हिसकावून घेऊ नका
आमच्या लेकराबाळांच्या तोंडातला घास
असा ओढून घेऊ नका...



**- लक्ष्मण वाल्डे - कन्नड**

## मित्रांनो थोडं धीर धरा

अपयश येईल जीवनात
मित्रांनो थोडं धीर धरा
यश नक्की मिळणारच
सातत्याने प्रयत्न करा

यश म्हणजे असते काय ?
यश असते प्रयत्नांचे फळ
मित्रांनो यशस्वी होताना
थोडे काढावेच लागते कळ

यश तुम्हाला मिळणार आहे
थोडे आणखी प्रयत्न करा
घामाचे तुमच्या अत्तर होईल
मेहनतीत अधिकचे रंग भरा

मित्रहो प्रयत्न करता करता
यशाला खेचून आणावे
अपयशाचे चिंतन करून
यशस्वी होऊन नाचावे

कठीण वेळ निघून जाईल
समजावून सांगा मनाला
मित्रांनो यशस्वी झाल्यावर
सांगावे लागत नाही जनाला

यशस्वी झाल्यावर सर्वत्र
तुमचा जयजयकार होईल
काल टोमणे मारणारे जग
तुमच्या यशाचे गोडवे गाईल



**नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**

## खोल मनातून तळ ढवळून काढणारी अस्सल बीज म्हणजे कविता - डॉ प्रभाकर शेळके




**देवळगाव राजा** : येथील कवी रमेश नरोडे यांच्या "भावनेचा लाटा"या कवितेचा प्रकाशन सोहळा ग्रामीण कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्यावेळी बोलताना ते म्हणाले कवी उघड्या डोळ्यांने जे पाहतो ते त्याच्या हळवार भावनेने शब्द अक्षरांने गुंफतो.ते त्याचे बीज होते आणि त्याला अस्वस्थ करते.हा समकालीन जगण्या भोगण्याचा भाग होऊन यांची कविता आली आहे.समाजकारण, राजकारण याबरोबरच आजच्या गावखेड्याचे भेदक लग्नाचे चित्रण ही त्यांची कविता करते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ मधुकर जाधव यांनी केले.कवी रमेश नरोडे यांनी आपल्या सृजनशील स्नेहाळू भावनेतून ऋणाई व्यक्त केली.या कवितेवर अभ्यासपूर्ण भाष्य डॉ भगवान खरात यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. बळीराम मापारी, प्रमुख पाहुणे गोविंद बोरकर, मधूकरबापू शेळके, श्री के.बी खांडेभराड, सुधीर जाधव हे उपस्थित होते. रत्नमाला रमेश नरोडे, शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ ज्योती देशमुख यांनी केले.

## महात्मा बसवेश्वर पतसंस्थेची विशेष सर्वसाधारण सभा संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूम या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा गुरुवारी (ता. 19) रोजी बसव भवन सभागृहात उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे होते. यावेळी प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किरण सगर, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, डॉ. महेश मोटे, संस्थेचे सचिव कमलाकर जाधव, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, संचालक मनिष मुदकण्णा अमृत वरनाळे, विजय काशेट्टी, श्रीशैल बिराजदार, शिवराज समन, बाबासाहेब पाटील, वंदना सोनवणे, इंद्रजित लोखंडे, संगिता जाधव आदी संचालकाची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संस्थेचे शिवशरण वरनाळे यांनी चालु वर्षाचा आर्थिक उलाढालीचे वाचन करून सन 2024—25 या आर्थिक वर्षाचा लेखाजोखा मांडून पतसंस्था उल्लेखनीय प्रगती करुन ठेवी व कर्जवाटप व भागभांडवलामध्ये व इतर व्यवहारात अपेक्षित वाढ होत असल्याची माहिती त्यांनी सभासदांना दिली. संस्थेचे आजचे भागभांडवल 1 कोटी 50 लाख, ठेवी 15 कोटी 89 लाख, कर्ज वाटप 13 कोटी 60 लाख, गुंतवणूक 5 कोटी 40 लाख, गतवर्षी नफा 29 लाख 50 हजार इतका झाल्याचे सभासदांना संभोदित करताना सांगितले. संस्थेचे सचिव कमलाकर जाधव यानी विशेष सर्वसाधारण सभेत अधिकृत भागभांडवल 15 कोटी, सभासदांच्या एका भागाची दर्शनी किंमत 100 रुपये असून आता ते 500 रुपये राहील. संस्थेच्या कर्मचारी वर्गासाठीचे सेवा नियम वाचून दाखविले. सर्वाच्या संमतीने टाळ्याच्या गजरात ठराव पास करण्यात आला व तो एकमताने मंजूर करण्यात आला. सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. अध्यक्षांनी आपल्या भाषणात संस्थेच्या प्रगतीसाठी सभासदांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले. भविष्यात अधिकाधिक सभासदांना कर्जसुविधा व आधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. शिवजयंती निमित्त प्रा. किरण सगर, प्रा. दता इंगळे, प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगते व्यक्त केली. सभेचे सूत्रसंचालन किरण गायकवाड तर आभार मनीष मुदकण्णा यांनी मानले. सभेला मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

## पुरस्कार

रात्री लागली झोप गाढ
अन् भेटला स्वप्नात
कवितेला पुरस्कार

अन् नाचू लागलो मी
आनंदाच्या भरात
तर तिनं हाणली
कानफटात जोरात

अन् म्हणाली
विसरलास का
श्रीकृष्णाचा सल्ला
कर्मफळाची आस सोडून
कुशलकर्म करण्याचा

अरे होत नसते
मोठी किंवा छोटी
पुरस्कार मिळाल्याने
अन् डावलल्याने
खरी कविता

दोन परीक्षक
अन् चार टाळ्यासाठी
भुकेली नसते कविता

बळीराजा बापासाठी
उन्हात तळते कविता
काळाच्या पाषाणाला
फोडून उगते कविता

व्यासपीठ अन् मंचांना
पुरून उरते कविता
हरणाऱ्या प्रत्येकाला
आधार देते कविता

शब्दांचा साधक तू
अडकू नकोस मोहात
वेदनेशी नाते जोड
करण्या अधिराज्य
जनमानसाच्या मनात
म्हणून मातीवर राहून
लिहित राहा मातीसाठी
मातीतल्या कविता

**ज्ञानेश्वर गायके,
कन्नड**

## बीड जिल्ह्यात "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान" राबविणार



**बीड (भगवंत पाळवदे)** : महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १)" राबविण्यात येणार असून मंडळ, तालुका तसेच नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसुली विषयांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे तात्काळ निराकरण शिबिरांमधून करण्यात येणार आहे.जिल्ह्यात १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्वतयारी करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ व १४ मार्च तसेच १० व १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर शिबिरे घेण्यात येतील. नगर परिषद व नगर पंचायत स्तरावरील शिबिरे ८ व १५ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.या अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतर, 'जिवंत ७/१२' मोहिमेद्वारे नोंदी दुरुस्ती, प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे आदेश वितरण, 'सर्वांसाठी घरे' अंतर्गत पट्टे वाटप, पाणंद रस्त्यांच्या मान्यता प्रक्रिया तसेच डिजिटल (QR कोडयुक्त) ७/१२ बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.याशिवाय लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवा वितरण, ई-मोजणी, अॅग्रीस्टॅक, पीएम किसान सेवा व जनता दरबार सुविधा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महसूल कायद्यातील कलम ४२ अन्वये अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुधारणा व एकवेळ अधिमूल्याच्या नव्या दरांबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व सर्व संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले असून प्रत्येक शिबिरानंतर विहित नमुन्यात अहवाल सादर करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.